जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID** : crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट दिनांक - १२/०१/२०२४**

**पोलीस आयुक्तालय पुणे शहर**

# राष्ट्रीय सुरक्षा एजन्सीकडुन पुणे पोलीसांना प्रशस्तीपत्रक

दिनांक १८/०७/२०२३ रोजी शास्त्रीनगर बीट मार्शलवरील **पोलीस अंमलदार, प्रदिप चव्हाण व अमोल नजन** हे शास्त्रीनगर पोलीस चौकी हद्दीत रात्रगस्त घालत असताना,रात्रौ ०२/३० वा. त्यांनी तीन संशयित दुचाकी चोरांना ताब्यात घेतले होते. सदर रात्रौ कर्तव्यावर असलेले पोलीस अंमलदार, बाला रफी शेख, अनिकेत जमदाडे, ज्ञानेश्वर पांचाळ, वैभव शितकाल यांनी वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली सदर इसम रहात असलेल्या ठिकाणीची घरझडतीसाठी नेले असताना, त्यांचे घरझडती मध्ये एक जिवंत काडतुस,चार मोबाईल, एक लॅपटॉप व इतर कागदपत्रे मिळुन आली होती. त्यामध्ये संशईत हे देशविघातक कृत्यास सहभागी असल्याचा संशय आल्याने,त्यांचेकडे अधिक तपास करता ते राष्ट्रीय सुरक्षा एजन्सी (**NIA**) फरार आरोपी असल्याचे निष्पन्न झाले होते. त्यांचेविरूध्द **कोथरूड पो स्टे येथे गुरनं.१७५/ २०२३, भा.दं.वि.सं.कलम ४६८, ३७९,५११,३४,भारतीय हत्यार कायदा कलम ३(२५),४(२५),महाराष्ट्र पोलिस ॲक्ट क.३७(१)३७(३),१३५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला होता.**

संशयित इसम हे देशविघातक कृत्यास सहभागी असल्याचे व त्यांना राष्ट्रीय सुरक्षा एजन्सी यांचेकडुन फरार घोषित केल्याचे निष्पन्न झाले होते. राष्ट्रीय सुरक्षा एजन्सी (**NIA**) यांचेकडुन सदर आरोपींवर रोख १० लाख रुपयांचे बक्षिस घोषित केले होते. आज दि. १२/०१/२०२४ पुणे शहर पोलीसांनी केलेल्या उत्कृष्ठ कामगिरी बाबत राष्ट्रीय सुरक्षा एजन्सी (**NIA**) चे पोलीस अधिकारी, श्री.इंगवले व पोलीस आयुक्त श्री. रितेश कुमार यांचे हस्ते **पोलीस अंमलदार, अमोल नजन, प्रदिप चव्हाण, बाला रफी शेख, अनिकेत जमदाडे, ज्ञानेश्वर पांचाळ** यांना पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर याठिकाणी बोलावुन सन्मान करण्यात आला.

राष्ट्रीय सुरक्षा एजन्सी (**NIA**) चे पोलीस अधिकारी, श्री.इंगवले हे मुंबई येथुन खास नमुद पोलीस अमंलदार **अमोल नजन, प्रदिप चव्हाण, बाला रफी शेख, अनिकेत जमदाडे, ज्ञानेश्वर पांचाळ** यांना रोख रक्कम व प्रमाणपत्र अदा करणेकरीता आयुक्तालयात उपस्थित राहीले. मा.पोलीस आयुक्त, श्री.रितेश कुमार, राष्ट्रीय सुरक्षा एजन्सी (**NIA**) चे पोलीस अधिकारी, श्री. इंगवले यांचे हस्ते कोथरुड पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक,श्री.हेमंत पाटील, पोलीस निरीक्षक निलिमा पवार यांचा देखील यावेळी प्रमाणपत्र देऊन सन्मान करण्यात आला. सदरवेळी पोलीस सह आयुक्त(अति.कार्यभार) श्री. रामनाथ पोकळे, अपर पोलीस आयुक्त,प्रशासन श्री. अरविंद चावरिया, हे उपस्थित होते.

